वर्ष-०८ | अंक-४० | मुंबई, मंगळवार २३ ते २९ ऑगस्ट - २०२२ | पृष्ठ-४

पोलीस बातमी पत्र

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2 सेक्स रॅकेटच्या संशयातून छापा, कॉन्स्टेबलकडून बलात्कार, मुंबईत महिलेच्या आरोपांनी खळबळ

3 → संग्रहालय होण्यापूर्वी..

70 लाखांना विकणार होते मांडूळ साप, सापळा रचून पोलिसांनी पाच जणांना केली अटक ← 4

# 13 लाखांच्या मुद्देमालासह मुंबईच्या चोरट्याला नागपुरात अटक

**शेगाव, अकोला आणि बडनेरा येथे तपासणी केली असता आरोपी सापडला नाही. त्यामुळे पुन्हा वर्धा येथे गाडीची तपासणी करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. यानंतर पथकाने कसून तपासणी केल्यावर आरोपी आढळून आला.**



नागपूरः मुंबईतून 13 लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून आरोपी रेल्वेने नागपुरकडे निघाला असल्याची माहिती सांताक्रुझ पोलिसांकडून नागपूर आरपीएफला मिळाली. प्राप्त माहितीच्या आधारावर शेगांव, अकोला आणि बडनेरा येथे गाडीची तपासणी करण्यात आली. मात्र यावेळी आरोपी सापडला नसल्याची माहिती आरपीएफला देण्यात आली. त्यामुळे पुन्हा वर्धा येथे गाडीची तपासणी करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. यानंतर पथकाने कसून चौकशी केल्यावर आरोपी आढळून आला.

वर्धा येथील स्टाफला घेऊन गाडी क्रमांक 12859 गीतांजली एक्सप्रेसची तपासणी केल्यावर एस 6 या बोगीच्या 62 क्रमांकाच्या सीटवर आरोपी असल्याची माहिती मिळाली. त्या सीटवर बसलेल्या इसमाला नाव विचारल्यावर त्याने दीपक बिनोद नायक (वय 44, रा. देउला पोस्ट भोगराई जि. बालेश्वर, उडीसा) असा पत्ता सांगितला. त्याच्याजवळ काळया रंगाची बॅग आढळून आली. तसेच चौकशीअंती सांताक्रूज येथून रोख रक्कम चोरी करण्याची कबूली दिली.

बॅगमधून मिळाले पुरावे रेल्वे नागपूरला पोहोचल्यावर अधिकाऱ्यांनी त्या आरोपीची पडताळणी सांताक्रूझ पोलिसांसकूडन करून घेतली आहे. त्याला गाडीतून उतरवून आरपीएफ ठाण्यात बोलविण्यात आले. उपनिरीक्षक सुभाष मडावी यांनी सीसीटीव्ही रुममधील दोन पंचांसमोर त्यांची बॅग तपासली, त्यात 411370 रुपये रोख, 91 हजार किमतीचे मंगळसूत्र, आरोपीच्या आईच्या खात्यातील 20 हजार रुपये, आरोपीच्या पत्नीच्या खआत्यातील 30 हजार रुपये तसेच स्वतःच्या खात्यातच 2 लाख रुपये जमा केल्याचे सांगितले. यासोबतच त्याच्या बॅगमधून गॅस कनेक्शनची कागदपत्रे, बँकेत पैसे जमा केल्याच्या पावत्या. घड्याळ, मोबाईल व कपडे आदी साहित्या जप्त केले.

## आरोपी सांताक्रूझ पोलिसांच्या ताब्यात

रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेने आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला अटक केल्यावर जप्त केलेल्या चोरीच्या मुद्देमालासह आरोपीची कस्टडी सांताक्रूझ पोलिसांच्या पथकाला काल देण्यात आली. यापूर्वीही अनेक घटनांमध्ये आरपीएफच्या कारवाईचे सर्वस्तरातून कौतूक केले गेले आहे. कारवाई आरपीएफ आयुक्त आशुतोष पांडे यांच्या नेतृत्वात कोटा जोजी, आर. एल. मिना, एन.पी. सिंग, सुभाष मडावी, देवेंद्र पाटील, प्रज्ञा मदनलाल, रामनिवास मीना, ए.के. शर्मा, मंगेश दुधाने, मुस्ताक, मुकेश राठोड, जसवीस सिंह यांनी केली.

# वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणुक करणा-या आरोपीस माणिकपुर पोलिसांनी केली अटक.



माणिकपुर : वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांकडून एकुण रु.११,००,०००/- रक्कम स्विकारुन फसवणूक करणाऱ्या भामट्याला माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली.

अधिक माहितीनुसार माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये जय पाटील, वय २० वर्षे यास मेडिकल कॉलेज मध्ये ऍडमिशन देतो सांगून डिसेंबर २०२१ ते आतापर्यंत आरोपी सुधांशु जगदंबा चौबे,

वय ३२ वर्षे याने त्याची मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया येथे ओळख असल्याचे सांगुन मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया मार्फत श्री. नर्सिंग दुबे चॅरिटेबल ट्रस्ट मेडिकल कॉलेज येथे मेडीकल फिल्डला ऍडमिशन करुन देण्याचे भासवले व त्यांच्याकडुन एकुण रु.११,००,०००/- रक्कम स्विकारुन मेडीकल कॉन्सील ऑफ इंडीयाच्या नावे बनावट ईमेल आयडी तयार केला. जय पाटील व इतर साक्षीदार यांना ऍडमिशन संदर्भात मेल करुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्या रकमेचा अपहार करुन त्यांची फसवणुक केली. हे जय पाटील,यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी दिनांक १३/०८/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारी वरून माणिकपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासात आरोपीने १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविदयालयामध्ये प्रवेश देण्यासाठी आतापर्यन्त एकुण रु. ६२,१२,८२०/- रक्कमेची फसवणुक केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने आरोपी सुधांशु जगदंबा चौबे, वय ३२ वर्षे, रा. शास्त्री नगर, वर्तक कॉलेज मागे, वसई पश्चिम, जि. पालघर यास दिनांक १३/०८/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करण्यात आली . आरोपीवर अश्या प्रकारचे ३ गुन्हे दाखल आहेत

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो.नि. अभिजीत मडके (गुन्हे), पो.नि. अशोक कांबळे (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, अनिल चव्हाण व पो.शि. प्रविण कांदे यांनी पार पाडलेली आहे.

# वसईत 20 वर्षीय तरुणाने टेरेसवरून उडी मारून केली आत्महत्या, पोलिसांचा तपास सुरू




वसई : वसई येथे एक धक्कादायक घटना घडलीयं. वसईत 20 वर्षीय तरुणाने राहत्या इमारतीच्या टेरेसवरून उडी मारून आत्महत्या केलीयं. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आनंद के प्रसाद असे आत्महत्या (Suicide) केलेल्या तरुणाचे नाव आहे. तो आयटीचा विद्यार्थी होता. वसई पश्चिमेच्या वसंत नगरी परिसरातील सेक्टर 2 मध्ये ही घटना घडलीयं. आज सकाळी साडेसात वाजता ही घटना घडली आहे. या 20 वर्षीय तरूणाने नेमकी कशामुळे आत्महत्या केली, याचा शोध आता पोलिसांकडून (Police) सुरूयं.

**20 वर्षाच्या तरूणाने राहत्या इमारतीच्या टेरेसवरून उडी मारत केली आत्महत्या**

आज सकाळी 20 वर्षाच्या तरूणाने राहत्या इमारतीच्या टेरेसवरून उडी मारत आत्महत्या केलीयं. हा तरूण क्लासला जाण्यासाठी निघाला होता. मात्र घरातून बाहेर पडल्यावर तो बाहेर न जाता टेरेसवर गेला आणि टेरेसवरून उडी मारून आत्महत्या केली. हा तरूण आयटीचा विद्यार्थी असल्याची देखील माहिती मिळते आहे. वसंत नगरी परिसरातील सेक्टर 2 ही घटना घडलीयं.

**माणिकपूर पोलिसांनी तपास केला सुरू**

तरुणाने आत्महत्या का केली याचे कारण स्पष्ट झाले नाहीयं. आत्महत्येच्या घटनेची माहिती मिळताच माणिकपूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. माणिकपूर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केलायं. आता पोलिस तरूणाने नेमक्या कोणत्या कारणामुळे आत्महत्या केली याचा शोध घेत आहेत.

# बोरीवलीत दोन गटात हाणामारी, परस्परविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल



मुंबई : मुंबईच्या दहिसर पूर्व मागाठाणे विधानसभेत रविवारी रात्री दोन गटात हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. लढणाऱ्यांमध्ये एक गट शिवसेनेशी संबंधित आहे, तर दुसरा गट आमदार प्रकाश सुर्वे यांचा समर्थक आहे. या घटनेत कोणताही राजकीय अंग नसून प्रत्येक गटातील एक जण जखमी (Injured) झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. दोन्ही गट यादव समाजाचे असून शेजारी राहतात. शिवसेनेचे माजी नगरसेवक बाळकृष्ण ब्रीद यांनी यापूर्वी मागाठाणेचे आमदार प्रकाश सुर्वे यांच्या समर्थकावर मारहाणीचा आरोप करून राजकारण जोडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी हा परस्पर वाद असल्याचे सांगत दोघांविरुद्ध एफआयआर नोंदवून तपास सुरू केला आहे.

## दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादातून रविवारी पुन्हा भांडण

**दोन दिवसांपूर्वी एका ग्राहकावरून दोन्ही गटात वाद आणि भांडण झाले होते. मात्र प्रकरण पोलीस ठाण्यात पोहोचले नाही, मुंबई पोलीस झोन 12 चे डीसीपी सोमनाथ घार्गे यांनी सांगितले. दोन दिवसांपूर्वी झालेल्या मारामारीवरून रविवारी रात्रीही दोन्ही गटातील लोकांमध्ये मारामारी झाली असून, दोन्ही गटातील प्रत्येकी एक- एक जण जखमी झाला आहे. सध्या दहिसर पोलीस दोन्ही बाजूंच्या लोकांविरुद्ध क्रॉस एफआयआर नोंदवून अधिक तपास करत आहेत. पोलीस ठाण्यात गेल्यावर शिवसेनेचे माजी नगरसेवक बाळकृष्ण ब्रीद यांनी दोघांना झालेल्या दुखापतींबाबत बोलण्यास सुरुवात केली आणि पोलिसांकडून निष्पक्ष तपासाची मागणी केली आहे.**

# शेतात नेलं अन् तिघांकडून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार



पुणे : पुण्यातील इंदापूर तालुक्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घडना उघडकीस आली आहे. एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस बळजबरीने शेतात ओढून नेत, तिच्यावर बलात्कार केल्याची घटना बेलवाडी (ता. इंदापुर) येथे घडली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, वालचंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. पैसे मिळत आहेत म्हणून ही महिलेने व्यवहार सुरु ठेवला आणि तब्बल 3 लाख 54 हजार इतकी रक्कम खर्च केली. पण नंतर या महिलेच्या खात्यात ना कमिशनची रक्कम आली आणि नाही खर्च केलेले पैसे. अखेर या महिलेला आपल्यासोबत फसवणूक झाल्याची जाणीव झाली आणि तिने पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून वालचंदनगर पोलीस ठाण्यात आरोपी राहुल हनुमंत जाधव (रा-बेलवाडी, ता. इंदापुर) यासह इतर दोन व्यक्ती यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २० रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मौजे बेलवाडी ता. इंदापूर येथील मक्याचे शेतात ही घटना घडली.

# घाटकोपरमधील कामराजनगरमध्ये रोड रोमियोला नागरिकांची बेदम मारहाण, अर्धनग्न अवस्थेत काढली धिंड



मुंबई : राज्यात मुलींची छेड काढण्याचं प्रमाण अधिक आहे. अशा प्रकरणामध्ये तक्रार दाखल झाल्यानंतर अनेक आरोपींना पोलिसांनी शिक्षा दिली आहे. परंतु तरीही अशी प्रकरण उघडकीस येत आहेत. मुंबईतल्या घाटकोपरमधील कामराजनगरमध्ये एका रोड रोमिओला रहिवाशांनी मारहाण केली आहे. एका 12 वर्षाच्या मुलीची छेड काढत असताना तिथं असलेल्या नागरिकांनी त्याचा चांगला चोप दिल्याची माहिती समजली आहे. ज्याला नागरिकांनी मारहाण केली, तो शाळेत जात असलेल्या मुलींना मारहाण करीत असल्याची माहिती मिळाली आहे. ज्यावेळी आरोपी कृत्य करित होता. त्यावेळी त्याला मारहाण करुन नागरिकांनी त्यांची अर्धनग्न अवस्थेत वरात काढली.

**अर्धनग्न अवस्थेत वरात देखील काढण्यात आली**

मागच्या काही दिवसांपासून एक रोड रोमियो शाळेत जात असलेल्या मुलींची छेड काढीत असल्याची माहिती नागरिकांना मिळाली. नागरिक फक्त एका तक्रारीची वाट पाहत होते. आज आरोपीने एका मुलीची छेड काढल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर तिथल्या नागरिकांनी त्याला पकडून बेदम मारहाण केली. तसेच त्याची तिथं अर्धनग्न अवस्थेत वरात देखील काढण्यात आली. नागरिकांनी भर रस्त्यात ऊठाबशा काढायला लावल्या आणि तोंडाला काळ देखील फासलं आहे. रोडरोमियोच्या बहिणीने सुध्दा त्याला चोपला आहे. सदर घटनेचा व्हिडीयो व्हायरल झाला आहे. प्रकरणाची पोलिसांनी घेतली दखल घेतली असून तक्रार नोंद करण्याचं काम सुरु असल्याची माहिती मिळाली आहे.

## सीसीटिव्हीच्या तपासानंतर अनेक घटना उघडकीस येण्याची शक्यता

**पोलिस व्हायरल झालेल्या व्हिडीओच्या आधारे पुरावे जमा करायला सुरुवात केली आहे. तसेच तिथले काही सीसीटिव्ही सुध्दा चेक केले जाणार असल्याची माहिती मिळाली आहे. तिथं अनेक मुलं छेडछाड करीत आहेत. त्यामुळे तिथल्या अनेक मुलांवरती कारवाई करण्यात येणार आहे. सध्या संबंधित आरोपीला पोलिस ताब्यात घेणार आहेत. त्याचबरोबर त्यांच्यासोबत आणखी कितीजण असतात त्याची देखील चौकशी होणार आहे.**

# चेंबूरमध्ये तरुणाची हत्या

## आरोपीला गोवंडी पोलिसांकडून अटक




मुंबई : चेंबूरमधील खारदेव नगर परिसरात वास्तव्यास असलेल्या एका तरुणावर चार दिवसांपूर्वी पूर्ववैमनस्यातून धारदार हत्याराने हल्ला करण्यात आला होता. उपचारादरम्यान रविवारी या तरुणाचा मृत्यू झाला. गोवंडी पोलिसांनी याप्रकरणी आरोपीला अटक केली आहे. विलास धनावडे असे मृत तरुणाचे नाव असून परिसरातच राहणाऱ्या विशाल माने (३२) याच्याबरोबर वाद होता. १८ ऑगस्टला विलास परिसरात असताना विशालने त्याच्यावर हल्ला केला होता. गंभीर जखमी झालेल्या विलासवर शीव रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र रविवारी दुपारी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गोवंडी पोलिसांनी यापूर्वीच गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. मात्र विलासच्या मृत्युची माहिती परिसरातील रहिवाशांना मिळताच त्यांनी रविवारी रात्री गोवंडी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला. आरोपीवर पोलिसांनी कडक कारवाई करावी अशी मागणी यावेळी स्थानिकांनी केली.

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार २३ ते २९ ऑगस्ट - २०२२

# हत्येच्या घटनेने जळगाव हादरलं

## भररस्त्यात तरुणावर सपासप वार, पोरगा गेला, बापाचे अश्रू थांबेना



जळगाव: दारू अड्ड्याजवळ वादातून चॉपरने भोसकून तरुणाचा खून केल्याची घटना घडली आहे. रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास जळगाव शहरातील शिवकॉलनी परिसरात ही घटना घडली. अक्षय अजय चव्हाण (वय-२३) असं मृताचं नाव आहे. अक्षयला वाचविण्यासाठी गेलेला त्याचा मित्र युवराज जाधव याच्यावरही चॉपरने वार केल्याने तो गंभीर जखमी आहे. त्यालाही जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मोबाईलच्या वादातून हा खून झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, अक्षय हा त्याच्या मित्रांसह घराजवळ गप्पा मारत होता. यादरम्यान दुचाकीवरून तीन ते चार जण आले त्याला कुठलंतरी काम सांगून सोबत घेऊन गेले. यानंतर शिव कॉलनीतील देशी दारूच्या दुकानावर अक्षयचा बाळू पवार नामक तरुणासोबत वाद झाला. या वादातून अक्षयने बाळूच्या भावाला दगड मारुन फेकला. याचा राग आल्याने बाळूने अक्षयच्या पोटात चॉपरने सपासप वार करुन त्याचा खून केला. यावेळी अक्षयच्या सोबत असलेला त्याचा मित्र युवराज मोतीलाल जाधव हा भांडणात पडला, तेव्हा त्याच्यावरही आरोपींनी वार करून त्यालाही जखमी केले. त्यानंतर बाळूसह मारेकरी घटनास्थळावरून पसार झाले. याच ठिकाणी मद्यप्राशन करत असलेल्या भारत बंडू राठोड या तरुणाने जखमी अवस्थेत पडलेल्या अक्षयला जिल्हा रुग्णालयात हलवले. या ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता त्याला मृत घोषित करण्यात आले. दरम्यान, जखमी युवराज यालाही उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मोबाईलवरुन हा वाद झाल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली आहे. मृत अक्षय हा जैन कंपनीत कामाला होता, मात्र तो आज कामावर गेला नव्हता. त्याच्या पश्चात आई रेणुका, वडील अजय भुरा चव्हाण, भाऊ शैलेश असा परिवार आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यावर अक्षय याच्या मित्र परिवारासह नातेवाईक यांनी जिल्हा रुग्णालयात गर्दी केली होती. या प्रकरणात जिल्हापेठ पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, जिल्हा रुग्णालयातील जखमीचे मित्र, मृताचे मित्र मोठ्याप्रमाणात जमल्याने त्यांनी संताप व्यक्त करत गोंधळ घातला. यावेळी जिल्हा पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक प्रदीप चांदेकर फिरोज शेख तसेच शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजयसिंग ठाकुरवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रीतम पाटील, अविनाश देवरे यांनी जिल्हा रुग्णालय गाठून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

# सेक्स रॅकेटच्या संशयातून छापा, कॉन्स्टेबलकडून बलात्कार, मुंबईत महिलेच्या आरोपांनी खळबळ

### पोलीस हवालदाराने आधी जेवायला नेले, मग हॉटेलच्या रुममध्ये नेऊन आपल्यावर बलात्कार केला, असा आरोप वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलेने केला आहे.



मुंबई : ४२ वर्षीय कॉन्स्टेबलने एका सेक्स वर्करवर बलात्कार केल्याचा खळबळजनक आरोप केला जात आहे. मुंबईतील एमएचबी पोलीस ठाण्यातील ४२ वर्षीय पोलीस हवालदारावर वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलेने बलात्काराचा आरोप केला आहे. सेक्स रॅकेट सुरु असल्याच्या संशयातून पोलिसांनी छापा टाकला होता, मात्र त्यात काहीच निष्पन्न न झाल्याने पोलिसांनी वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलेला चौकशीसाठी बोलावले होते. त्यानंतर घरी सोडण्याच्या बहाण्याने हवालदाराने तिच्यावर रेप केल्याचा आरोप आहे. आधी एकत्र जेवण केले, मग हॉटेलच्या रुममध्ये नेऊन पोलिसाने आपल्यावर बलात्कार केला, असा आरोप पीडितेने केला आहे. पीडित महिलेने कनाकिया पोलिस स्टेशन गाठून घटनेची माहिती दिली, त्यानंतर कनाकिया पोलिस स्टेशनच्या पोलीस उपायुक्तांनी चौकशी सुरू केली आहे.

**काय आहे प्रकरण?**

10 ऑगस्ट रोजी ही घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. एमएचबी पोलिसांना त्यांच्या कार्यक्षेत्रात वेश्या व्यवसायाचे रॅकेट सुरु असल्याची माहिती मिळाली होती. छापा टाकण्यासाठी पोलिसांनी बोगस ग्राहकाला पाठवले. परंतु यात कुठलाही दलाल सहभागी नसल्याने छापा व्यर्थ ठरला. पोलिसांनी दिवसभर एका सेक्स वर्करची चौकशी केली आणि नंतर तिला सोडून दिले. मीरा रोड येथेच राहत असल्याचं कारण सांगत आरोपी कॉन्स्टेबल राजरतन काळे याने महिलेला तिच्या घरी सोडण्याचे आश्वासन दिले, पण त्याऐवजी तो तिला हॉटेलमध्ये घेऊन गेला. पीडितेच्या म्हणण्यानुसार, दोघांनी हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये जेवण केले, त्यानंतर काळेने तिला एका खोलीत नेले आणि तिथे तिच्यावर बलात्कार केला.

अलिकडेच महिलेने ती राहत असलेल्या परिसरातील कनाकिया पोलिस स्टेशनमध्ये जाऊन पोलिसांकडे तिचा जबाब नोंदवला. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तिने एमएचबी पोलिस स्टेशनचे प्रभारी डीसीपी (झोन-11) यांच्याकडे लेखी तक्रार देखील केली आहे.

# फुफ्फुसाच्या कर्करोगाविषयी...

सध्या जगभरातच विविध प्रकारच्या कर्करोगांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यातही फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण बरेच असून यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे. भारतात फुफ्फुसाचा कर्करोग मोठ्या प्रमाणावर वाढत असून विविध प्रकारच्या कर्करोगाच्या रुग्णांपैकी ५.९ टक्के रुग्ण फुफ्फुसाच्या कर्करोगाचे असतात. म्हणूनच या व्याधीविषयी जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.



आयसीएमआरच्या म्हणण्यानुसार देशभरातल्या फुफ्फुसाच्या कर्करोगग्रस्तांची संख्या २०२५ पर्यंत मागील दशकाच्या तुलनेत सातपटींनी वाढणार आहे. तसेच फुफ्फुसाच्या कर्करोगाचे निदान उशिरा झाल्याने गुंतागुंत अधिकच वाढते. ४५ टक्के प्रकरणांमध्ये निदान होईपर्यंत फुफ्फुसाचा कर्करोग शरीराच्या अन्य भागात पसरल्याचे दिसून येते. धूम्रपान करणाऱ्यांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक असले तरी वाढत्या वायू प्रदूषणामुळे धूम्रपान न करणाऱ्यांनाही फुफ्फुसाचा कर्करोग होताना दिसत आहे. या व्याधीबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे.

शस्त्रक्रिया, रेडिओथेरपी तसेच अन्य वैद्यकीय उपचार करून फुफ्फुसाच्या कर्करोगावर नियंत्रण आणले जाते. कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्याच्या थेरपी, इम्युनोथेरपी तसेच किमोथेरेपीमुळे रुग्णाच्या आयुष्याचा दर्जा तर सुधारतोच, शिवाय त्याचे आयुष्यही वाढते. मात्र, यासाठी आजाराचे निदान वेळेत होऊन योग्य उपचार सुरू होणे आवश्यक आहे.

फुफ्फुसाचा कर्करोग ही गंभीर व्याधी असली तरी वैद्यकीय क्षेत्रातल्या प्रगतीमुळे त्यावर उपचार करणे शक्य झाले आहे. उपचारांनंतर रुग्णाचे आयुर्मानही वाढू लागले आहे. पहिल्या टप्प्यात निदान झालेले रुग्ण पूर्णपणे बरे होऊन आनंदी आयुष्य जगत आहेत. शिवाय चौथ्या टप्प्यातल्या रुग्णांचे आयुष्य वाढताना दिसत आहे. त्यामुळे फुफ्फुसाचा कर्करोग म्हणजे आयुष्याचा अंत असा विचार न करता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून औषधोपचार घेतल्यास चांगले आयुष्य जगता येणे शक्य आहे, असे तज्ज्ञ सांगतात.

फुफ्फुसाचा कर्करोग झालेल्या रुग्णांवर लोबेक्टॉमी नामक शस्त्रक्रिया केली जाते. ही प्रमुख शस्त्रक्रिया असून यानंतर रुग्ण बरा व्हायला काही कालावधी जावा लागतो. या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला धाप लागणे, वेदना, अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

# शरीर आखडते?



सकाळी उठल्यानंतर कसे ताजेतवाने वाटायला हवे. मात्र, बऱ्याचजणांना सकाळी उठल्यावर शरीर आखडल्यासारखे वाटते. कधी तरी असे वाटणे ठीक आहे. मात्र, ही समस्या रोजच जाणवत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. शरीरात पोषक घटकांची कमतरता निर्माण होणे, चुकीच्या स्थितीत झोपणे, उंच उशी वापरणे अशा अनेक कारणांमुळे शरीर आखडू शकते. याच्या कारणांचा शोध घेऊन योग्य ते उपचार करणे आवश्यक आहे.

शरीराला विविध पोषक घटकांची आवश्यकता असते. कर्बोदके, प्रथिने, कॅल्शियम, विविध जीवनसत्त्वे, खनिजे तसेच अन्य घटकांची आवश्यकता असते. पोषक घटकांच्या कमतरतेमुळे अनेकसमस्या निर्माण होतात. शरीर आखडणे ही सुद्धा अशीच एक समस्या. काही पोषक घटकांच्या कमतरतेमुळे सकाळी उठल्यावर शरीर आखडल्यासारखे वाटते. रात्री चुकीच्या पद्धतीने किंवा चुकीच्या स्थितीत झोपल्यामुळेही हा त्रास होऊ शकतो. टणक किंवा गरजेपेक्षा अधिक उंच उशी वापरल्यामुळेही शरीर आखडू शकते. पाठदुखी, मान आखडणे, मानदुखी अशा समस्या निर्माण होऊ शकतात. इतकेच नव्हे बैठी जीवनशैलीही या शारीरिक समस्येला कारणीभूत ठरू शकते. एकाच स्थितीत बसून काम करणे, रात्री उशिरापर्यंत कॉम्प्युटर, लॅपटॉपवर बसून काम करणे, एकाच स्थितीत बराच काळ टीव्ही बघणे तसेच पाठीच्या कण्याच्या वरच्या भागातला ऑस्टिओआर्थरायटिस या कारणांमुळेही शरीर आखडू शकते.

पोटावर झोपल्यामुळे मान दुखू शकते. पोटावर झोपताना डोके एकाच स्थितीत बराच काळ राहाते. यामुळे मानेतले स्नायू खेचले जाऊन त्रास होऊ शकतो. अशा पद्धतीने झोपल्यामुळे सकाळी उठल्यावर मान आखडू शकते. कधी-कधी बिछान्यावरून पटकन उठल्यामुळे, वेगाने कूस बदलल्यामुळेही मान, खांदा लचकू शकतो. यामुळेही सकाळी वेदना जाणवू शकतात.

उशी आणि गादी आरामदायी नसेल तर सकाळी उठल्यावर शरीरात वेदना जाणवू शकतात. यासोबतच स्नायू किंवा हाडांशी संबंधित व्याधी असल्यास वेदना जाणवू शकतात. त्यामुळे कोणत्याही शक्यतेकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांकडे जा. चुकीची शारीरिक स्थिती, बैठी जीवनशैली यामुळे शरीर आखडत असेल तर तुम्ही योगासनांची मदत घेऊ शकता. गोमुखासन केल्याने शरीराच्या वेदना कमी होऊ शकतात. हे आसन केल्याने कंबरदुखी कमी होऊ शकते. मधुमेहींनी गोमुखासन करायला हवे. हात, खांदे तसंच मान आखडण्याचा त्रासही कमी होऊ शकतो. उत्कटासनामुळेही शारीरिक वेदना दूर होऊ शकतात. यामुळे स्नायू बळकट होतात. हात पाय ताणले गेल्याने ताजेतवाने वाटते. पोटाच्या तक्रारी दूर होतात. भुजंगासन केल्याने पोटाची चरबी कमी होते. सायटिका तसेच स्लीप डिस्कचा त्रासही कमी होतो. पचनसंस्थेचे कार्य सुरळीत सुरू राहाते. सकाळी उठल्यावर मानेत वेदना जाणवत असतील तर त्यावर बर्फ लावता येईल. मात्र, कोणत्याही वेदनांवर घरगुती उपचार करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# ॲनारोक्सिया नर्वोसा म्हणजे काय?

ॲनारोक्सिया नर्वोसा ही एक प्रकारची मानसिक अवस्था आहे. यामध्ये व्यक्ती आपल्या वजनाविषयी अधिक संवेदनशील होतो. व्यक्तीला सतत भीती वाटत राहते की भरपेट जेवल्याने तो लठ्ठ होईल. त्यामुळे व्यक्तीचा आहार अनियमित होतो आणि अनियमित -कमी आहारामुळे आरोग्यावर वाईट परिणाम होतो. शरीर आतून कमजोर होऊ लागते.



ॲनारोक्सियाचा आजार असणाऱ्यांचे वजन काही आठवड्यातच २५ टक्के कमी होते. ज्या लोकांमध्ये ही इटिंग डिसऑर्डर असते ते भूक आहे, असे कधीच मान्य करत नाहीत. खरोखरीच त्यांना भूक लागली असेल किंवा त्यांच्या शरीराला अन्नाची गरज असेल तरीही ते खायला नकार देतात. त्यांना सतत असे वाटते की, जेवले किंवा खाल्ले तर त्यांचे वजन वाढेल. जेव्हा व्यक्तीचे वजन कमी होते, तेव्हा व्यक्तीचा मेंदूतील उत्साह वाढवणारा हिस्सा सक्रिय होतो. जेवण करण्यासाठी प्रेरणा देण्यापेक्षा तो भाग उलटे काम करू लागतो. कदाचित या कारणामुळेच अनारोक्सियाने ग्रस्त व्यक्तींचा स्वभाव चिडचिडा होतो.

पूर्वी झालेल्या संशोधनानुसार या प्रकारच्या विकारामागे आनुवांशिकता आणि हार्मोनल बदल कारणीभूत होते. सेरोटोनिन आणि ॲनारोक्सिया यांच्या दरम्यान काही संबंध असल्याचे काही पुरावेदेखील मिळाले आहेत. सेरोटोनिन हे मेंदूत आढळणारे रसायन आहे. या आजाराने पीडित व्यक्तीला वजन वाढण्याचे इतके भय असते की, ती व्यक्ती जेवली तरीही लगेचच उलटी काढून ते जेवण बाहेर काढते. किंवा शौचावाटे बाहेर टाकले जाते. ॲनारोक्सियाने ग्रस्त लोकांना समाजात मिसळायला आवडत नाही. ते एकांतप्रिय असतात. ते स्वतः ला जगापासून वेगळे ठेवतात आणि लांब राहातात. आपल्या कुटुंबीयांबरोबर तसेच मित्रांबरोबरही वेळ घालवू इच्छित नाहीत.

एखादी व्यक्ती जेव्हा आपल्या खाण्याच्या सवयींमध्ये अचानक बदल करते, तेव्हा ती ॲनारोक्सियाची लक्षणे असतात. एखादी व्यक्ती आपल्या वजनामुळे चिंताग्रस्त असेल आणि नियमित आपले वजन तपासून पाहात असेल तर ते देखील ॲनारोक्सियाचे लक्षण आहे. इतर लक्षणांमध्ये थकवा, केस गळणे, बद्धकोष्ठता, लघु रक्तदाब, चिडचिडा स्वभाव हीदेखील लक्षणे आहेत. इटिंग डिसऑर्डर दोन प्रकारचे असतात. भूक असूनही वजन वाढेल या भीतीने रुग्ण जेवत नाहीत त्याला ॲनारोक्सिया नर्वोसा म्हणतात. तर एकाचवेळी भरपूर जेवण करून मग ते उल्टी करून बाहेर काढणे याला बुलिमिया नर्वोसा म्हणतात. दोन्ही स्थिती या आरोग्यासाठी योग्य नाहीत. हा त्रास कमी वयापासून सुरु होतो. दीर्घकाळ ही स्थिती कायम राहिली तर ती घातक ठरते. दीर्घ काळापासून पीडित व्यक्ती आत्महत्याहीदेखील करण्याची शक्यता वाढते. यामुळे मेंदूमध्ये सेरोटोनिन आणि डोपामाइन नावाच्या रसायनांचे असंतुलन होते. त्यामुळे मनोविकार निर्माण होतात. ही विकृती कॉग्निटिव्ह बिहेवियर थेरेपी ने बरी करता येऊ शकते.

### अनेक अवयवांवर परिणाम

**हृदयसंबंधी समस्या :** अनारोक्सियामुळे हृदयाची धडधड कमी होते, लघु रक्तदाब, हृदयाच्या स्नायूंचे नुकसान होते.

**रक्ताची समस्या :** अनारोक्सियाने ल्युकोपेनिया आणि ॲनिमियादेखील होऊ शकतो.

**जठरांत्रसंबंधी समस्या :** आतड्यांचे चलनवलन किंवा कार्य खूप कमी होते.

**मूत्रपिंडाची समस्या :** शरीरातील पाणी कमी झाल्याने अतिप्रमाणात मूत्र निर्माण होते. तसेच मूत्रनिर्मिती अधिक होते.

**हार्मोनविषयी समस्या :** विकासाशी निगडीत हार्मोन्सची पातळी कमी असेल तर किशोरावस्थेदरम्यान विकासाचा वेग कमी होऊ शकतो.

संपादकीय...



# सुरक्षेचे गांभीर्य

रायगड जिल्ह्यात शस्त्रासह बोट सापडल्याने महाराष्ट्रासह देशभरात खळबळ उडाली. आपल्या देशात सत्य परिस्थिती, वस्तुस्थिती जाणून न घेता तत्काळ अफवा वाऱ्याच्या वेगाने पसरत असल्याने चिंतेचे बाब निर्माण झाली. वृत्तवाहिन्यांवर सातत्याने तीच बातमी दाखविली गेल्याने आणि सोशल मीडियावर तत्काळ हे वृत्त 'व्हायरल' झाल्याने चिंतेचे सावट पसरले. कोणत्याही गोष्टीची तळाशी जाऊन सखोल चिकित्सा न करता अफवांवर लगेचच विश्वास ठेवल्याने रायगडच्या बोटीची वस्तुस्थिती काही वेगळीच असताना कपोलकल्पित वृत्त वाऱ्यासारखे पसरले. इतकेच काय एटीएसच्या प्रमुखांनाही रायगडला बोटीच्या ठिकाणी धाव घ्यावी लागली. या धक्क्यातून सावरले जात नाही तोच २६/११ सारखा हल्ला करण्याची धमकी देण्यात आली. पुन्हा चर्चेचे गुऱ्हाळ सुरू झाले. धमकी देऊन कोणी हल्ला करत नाही आणि हल्ला करणारे कधी धमकी देत नाही. २६/११ च्या घटनेत कसाब व त्याच्या सहकाऱ्यांनी सागरी मार्गाने हल्ला करत हाहाकार निर्माण केला होता. या घटनेने देशाच्या सागरी सुरक्षा व्यवस्थेचे निघालेले धिंडवडे जगाला पाहावयास मिळाले. पाकिस्तानातून आलेले दहशतवादी कोणत्याही अडथळ्याविना मुंबईच्या 'गेट वे ऑफ इंडिया'वर पोहोचले. कामा रुग्णालय व परिसरात दहशतीचे तांडव निर्माण केले. गलथान सुरक्षा व्यवस्थेमुळे एटीएसचे प्रमुख हेमंत करकरे, एन्काऊंटर स्पेशालिस्ट साळसकर, उन्नीकृष्णन, तुकाराम ओंबळे यांसारखी अनेक रत्ने आपल्याला गमवावी लागली. भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचा ढिसाळपणा आणि देशाच्या सुरक्षेबाबत असलेली अनास्था या घटनेतून जगाला जवळून पाहावयास मिळाली. सुदैवाने रायगडला सापडलेल्या बोटीने चिंतेचे कारण नसल्याचे तपासामध्ये स्पष्ट झाले असले, तरी यानिमित्ताने निर्माण झालेली धावपळ ही चिंताजनक बाब आहे.

आपणच आपल्या देशाची सुरक्षाव्यवस्था पोलादी स्वरूपाची निर्माण केली, तर अशा घटनांनी कोणतीही चिंताजनक, धक्कादायक स्वरूपाची भीती निर्माण होणार नाही. देशाच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत कानाकोपऱ्यांत, गल्लीबोळांत आपण काटेकोरपणे सुरक्षाव्यवस्था निर्माण करू शकत नाही. देशाच्या सीमारेषा मजबूत करण्याचे, सागरी सुरक्षा व्यवस्थेला प्राधान्य देण्याचे काम केंद्र सरकारचे आहे आणि त्या त्या राज्यांतील अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचे नियंत्रण करण्याचे काम त्या त्या राज्य सरकारचे आहे; परंतु प्रत्येक गोष्ट जवानांवर, पोलिसांवर, नौदलावर, राज्य व केंद्र सरकारवर सोपवून चालणार नाही. आपलाही त्यात सहभाग असणे आवश्यक आहे. कारण कोणतेही कार्य दोन्ही बाजूने सकारात्मक पद्धतीने होणे आवश्यक आहे.

राज्य सरकार, केंद्र सरकार, जवान, पोलीस, नौदल त्यांचे कार्य प्रामाणिकपणे करत असले तरी विस्तिर्ण भूभाग, वाढती लोकसंख्या पाहता सुरक्षेला मर्यादा पडणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ असा नाही की, सुरक्षेतील ढिसाळपणाचेही समर्थन आपण करतोय. ढिसाळ सुरक्षा व्यवस्थेचे समर्थन कोणी करू शकत नाही आणि करणारही नाही. २६/११च्या घटनेनंतर प्रशासन त्यांच्या पद्धतीने डागडुजीचे, कडेकोट सुरक्षा व्यवस्थेचे कार्य करत आहे; परंतु त्या घटनेनंतर इतक्या वर्षांत आपण काय केले? तकलादू सुरक्षा व्यवस्थेचा कित्येक महिने विषय चघळला. आपले बौद्धिक पाजळत मत मांडले. दर वर्षी मेणबत्त्या पेटवित २६/११च्या हल्ल्यातील शहिदांना व मृत्युमुखी पडलेल्या इतर सर्वसामान्यांना श्रद्धांजली वाहणे यापलीकडे काय केले? दर वर्षी २६/११ आल्यावर त्या घटनेला उजाळा देणे, सोशल मीडियावर पोस्टर, बॅनर व्हायरल करून श्रद्धांजली वाहताना त्यातही आपली प्रसिद्धी करण्याचे सोपस्कारही राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील घटकांकडून प्रामाणिकपणे पार पाडले जातात.

• • •

# संग्रहालय होण्यापूर्वी..

आता हिवाळी अधिवेशन नव्या इमारतीत होईल. जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मसुदा समितीने देशाला संविधान अर्पण केलं होतं, ते संसद भवन संग्रहालय होऊन जाईल! या पार्श्वभूमीवर तिथल्या आठवणी.

संसद भवन, संसदेचं आवार तसंच राहणार आहे. मध्यवर्ती सभागृहामध्ये अनेक मान्यवरांची तैलचित्रं आहेत. संसद भवनामध्ये अनेक नेत्यांचे पुतळे आहेत. संसदेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे मराठी अस्मितेला साद घालतात. याच आवारात शाहू महाराजांचाही पुतळा आहे पण, तो सुरक्षेच्या आड दडलेला आहे. शाहू महाराजांचा पुतळा संसद भवनाच्या पाच क्रमांकाच्या प्रवेशद्वारालगत उभा केलेला आहे. पाच क्रमांकाच्या प्रवेशद्वारातून पंतप्रधान आत जातात. त्यामुळं त्या बाजूला कोणालाही प्रवेश नसतो. संसदेवर हल्ला होण्यापूर्वी आवार सगळ्यांसाठी खुलं होतं. दिल्ली परिवहनची बस आतपर्यंत येत असे. आता संसदेच्या आवारातील दर्शनी अर्ध्या भागातच ये-जा करता येते. विशेष परवानगी काढून पंतप्रधानांच्या प्रवेशद्वाराच्या पलीकडे जाऊन शाहू महाराजांचा पुतळा पाहायला हवा! संसदेच्या आवारात काहीच बदलणार नाही; पण नवी इमारत कार्यरत होईल तेव्हा ऐतिहासिक संसद भवन सर्वार्थानं मागे पडेल. अगदी वस्तुनिष्ठपणेही! साहचर्यापेक्षा समूळ नष्ट करण्याच्या भावनेतून होत असलेल्या राजकारणाचा पुढला टप्पा संसदेच्या नव्या इमारतीत कदाचित पाहायला मिळू शकेल.

संसदेचे पावसाळी अधिवेशन संपण्याच्या आधी दोन दिवस, ६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी सात-साडेसात वाजता उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. रात्री नऊच्या सुमारास संसद भवनातून बाहेर पडलो, नीरव शांतता होती. संसद भवन तिरंगी दिव्यांनी न्हाऊन निघालं होते. पहिल्या मजल्यावरून नव्या इमारतीवरील वादग्रस्त सिंहमुद्रा दिसतात. त्या पाहून सहकारी पत्रकार म्हणाला, 'इतक्या रात्री संसदेत निवांत फिरतोय, असं पुन्हा फिरता येईल का?' त्याचा रोख संसदेच्या नव्या इमारतीकडे होता. नव्या



इमारतीच्या आतमध्ये रचना कशी असेल, हे कोणालाच माहीत नाही. जुन्या इमारतीमध्ये तळमजल्यावर, पहिल्या मजल्यावर असलेल्या बाहेरच्या गोलाकार लॉबीमध्ये पत्रकारांचा वावर असतो. ओळख असो वा नसो, पत्रकारांनी थांबवलं की, खासदार बोलतात. भाजपचे खासदार असतील तर, थोडं सावध उत्तर असतं.

तळमजल्यावर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान भेटले. त्या दिवशी बहुधा ते आनंदात असावेत. ''जनसत्ता का भाई लोकसत्ता'' असं म्हणत त्यांनी खांद्यावर हात ठेवला, दोन वाक्यं बोलले आणि निघून गेले! राज्यसभेत जाण्यासाठी संसदेच्या १२ क्रमांकाच्या दरवाजातून खासदार आत येतात म्हणून राज्यसभा 'कव्हर' करणारे पत्रकार तिथे उभे असतात. राज्यसभेच्या लॉबीकडे जात असताना सोनिया गांधी लगबगीने पुढे निघून गेल्या. मराठी खासदार भेटल्यामुळे थांबलो होतो. सोनियांचं या खासदाराकडे लक्ष नव्हतं. पण, कोणी तरी ओळखीचं असावं, असं वाटून त्या तशाच परत आल्या. संबंधित खासदाराची अदबीने विचारपूस करून पुढे गेल्या. खासदार म्हणाला, 'ही अदब म्हणजे काँग्रेस नव्हे, व्यक्तिगत सोनिया गांधी!' दोन आठवड्यांपूर्वी राज्यसभेच्या प्रवेशद्वारासमोर उभ्या उभ्या नारायण राणे आमच्याशी मराठी पत्रकारिता या विषयावर १५-२० मिनिटं बोलत होते. मैफल अशी रंगली की, कुतूहलाने सुरक्षारक्षकही मंत्री काय सांगताहेत एवढं असं म्हणून पाहू लागले होते.

करोनाचं कारण देऊन सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांच्या, सामान्य लोकांच्या प्रवेशावर निर्बंध आणले आहेत. त्यामुळे प्रेक्षकांचे आणि पत्रकारांचे कक्ष ओस असतात. करोनाच्या निर्बंधांमुळे खासदारांना प्रेक्षक कक्षांमध्ये बसावं लागत होतं. सकाळी राज्यसभा, दुपारनंतर लोकसभा असं दोन सत्रांमध्ये दोन सभागृहांचं काम चालत असे. प्रश्नोत्तराच्या वा शून्य प्रहारात खासदारांची शोधाशोध होत असे. एखादा खासदार सापडला नाही की, तो स्वत:च ज्या सभागृहात असेल तिथून 'मी इथं आहे, बोलू का', असं विचारत असे. करोनाकाळात सभागृहांतील कामकाजाचं कधी कधी असं विनोदात रूपांतर होई. पण, याच करोनाकाळात संसदेने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शेतकऱ्यांना 'परोपजीवी', 'आंदोलनजीवी' असं हिणवताना पाहिलं. लोकसभा आणि प्रामुख्याने राज्यसभेत अभूतपूर्व गोंधळ पाहिला, खासदारांचं निलंबनही पाहिलं. संसदेच्या आवारात पत्रकारांशी खासगीत बोलताना केंद्रीय मंत्र्यांनी शेतकऱ्यांची चेष्टा करतानाही पाहिलं. करोनाच्या आधी दोन वर्षांमध्ये दोन लक्षवेधी घटना पाहिल्या. २०१९ ची लोकसभा निवडणूक होण्याआधी फेब्रुवारीमध्ये झालेल्या अखेरच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींना मिठी मारून अचंबित केलं होतं. लोकसभेच्या पत्रकार कक्षात बसलेल्या आम्हाला नेमकं काय झालं, हे आधी नीट कळलं नाही. लोकसभेच्या पत्रकार कक्षाच्या थेट खाली लोकसभाध्यक्ष बसतात. त्यांच्या उजवीकडे सत्ताधारी बाकांवर मोदी आणि डावीकडे विरोधी बाकांवर राहुल गांधी बसलेले होते. लोकसभाध्यक्षांच्या आसनावर सुमित्रा महाजन होत्या. अचानक गोंधळ झाला म्हणून पुढे कक्षाच्या पहिल्या रांगेत जाऊन वाकून पाहिलं तर राहुल गांधी आपल्या आसनावर जाऊन बसले होते. त्याआधी मिठी होऊन गेली होती.५ ऑगस्टला लोकसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या कानाचं त्या कानाला कळू न देता जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार काढून टाकणारं, अनुच्छेद ३७० रद्द करणारं विधेयक मांडलं. त्यावरील चर्चेला शहांनी दिलेलं उत्तर इतिहासाचा अनुक्रम सांगणारं होतं. 'क्रोनोलॉजी समझीए' असं ते असंख्य वेळा म्हणाले. आता त्यांचा हा शब्द विरोधकांनीही उचलला आहे! लोकसभेत हे विधेयक संमत झाल्यावर सत्ताधारी बाकांवरून झालेला जल्लोष पाकिस्तानविरोधातील युद्ध जिंकल्यासारखा होता.करोनाच्या काळात काही संसद सदस्यही गेले. मराठी संसद सदस्यांसाठी, पत्रकारांसाठी हुरहुर लावणारी घटना म्हणजे राजीव सातव यांचं जाणं. काँग्रेस मुख्यालयाच्या शेजारी असलेल्या मीना बागेतील घरी अनेकदा त्यांची भेट होत असे. राज्यसभेचे खासदार झाल्यावर सातव महादेव रोडवरील निवासस्थानी राहायला गेले. तिथे त्यांची अखेरची भेट झाली, त्याच दिवशी ते गावी निघून गेले, ते परत आले नाहीत.

परवा खूप दिवसांनी, दोन वर्षांनंतर, संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात सदस्यांची गर्दी पाहायला मिळाली. करोनाकाळात मध्यवर्ती सभागृहात कोणालाही जाता येत नव्हतं. आताही पत्रकारांसाठी प्रवेश बंद आहे. पण, तिथल्या कॉफी बोर्डाच्या कॅन्टीनजवळ उभं राहून सभागृहात काय चाललंय हे दिसतं. बऱ्याच दिवसांनी मध्यवर्ती सभागृह भरलेलं होतं. खासदारांच्या गप्पा रंगल्या होत्या. इथे भाजपचे खासदार वा मंत्री कधी दिसत नाहीत. इथे येऊन वेळ वाया घालवायचा नाही, असं स्पष्ट शब्दांत त्यांना सांगण्यात आलेलं असल्याने भाजपचे खासदार तिकडे वळूनही पाहात नाहीत! फक्त राष्ट्रपतींच्या अभिभाषणासाठीच ते मध्यवर्ती सभागृहात येत असावेत. विरोधी सदस्य मात्र गप्पाटप्पांमध्ये रंगतात. जे रमत नाहीत, त्यांच्यापैकी काही सभागृहासमोर असलेल्या छोट्या ग्रंथालयात बसलेले दिसतात. अनेकदा विधेयकावर बोलायचं असतं, भाषणासाठी टिपण काढण्यात सदस्य व्यग्र असलेले पाहिले आहेत. संसदेच्या नव्या इमारतीत मध्यवर्ती सभागृहच नाही. तिथं संविधान कक्ष असेल. त्यांचं स्वरूप कसं असेल, संसद सदस्यांना एकत्र येण्यासाठी जागा असेल का, अशा अनेक प्रश्नांची उत्तरं मिळालेली नाहीत. गेल्या तीन वर्षांमध्ये संसद पेपरलेस आणि कॅशलेस झालेली आहे. २०१९ पूर्वी वेगवेगळे संसदीय अहवाल लेखी स्वरूपात मिळत असत. आता ते संकेतस्थळांवर पाहता येतात वा पीडीएफ कॉपी पत्रकारांना पाठवली जाते.

संसदेत आता रोख पैसे चालत नाहीत. संसदेतील कॅन्टीन्स पूर्वी रेल्वे विभागाकडून चालवली जात. संसद भवनाच्या समोर असलेल्या भल्या मोठ्या ग्रंथालयाच्या इमारतीच्या तळमजल्यावरील कॅन्टीनमध्ये रियाझभाई होते. रियाझभाई पत्रकारांना प्रिय. अनेकजण त्यांना २००-४०० रुपये आगाऊ देऊन ठेवत असत. दुपारच्या वेळी चहा-खाणं झालं की, रियाझभाई त्या पैशांचा हिशोब ठेवत असत. दर शुक्रवारी रियाझभाई नमाझ पठणाला जात पण, पत्रकार आतमध्ये गप्पा मारत बसलेले असत. पत्रकारांच्या भरवशावर ते बिनधास्त असत. आता कॅन्टीन 'आयटीडीसी' चालवतं. डेबिट कार्डावरून पैसे द्या आणि खा-प्या. संसदेच्या आवारातील कुठल्याही कॅन्टीनमध्ये वापरता येईल असं स्टेट बँकेचं रुपी कार्ड उपलब्ध आहे. हे कार्ड रीफिल केलं की काम झालं. संसदेतील व्यवहार आधुनिक झाले आहेत. पण, आता तिथे रियाझभाईंशी होत असे तसा कुणाशीच संवाद होत नाही. संवाद नसेल तर, सगळंच निर्जीव होऊन जातं.

राज्यसभेचे मावळते (आता माजी) सभापती व्यंकय्या नायडू यांचं अखेरचं भाषण होतं म्हणून सभागृहात गेलो. त्यांनी आश्चर्यकारकरीत्या भाषण थोडक्यात आटोपून टाकलं. विधेयक संमत करायचं होतं म्हणून कदाचित तसं झालं असावं, अन्यथा नायडूंनी बोलण्याची संधी सोडली नसती. नायडू सभागृहातून उठून गेल्यावर बाहेर आलो. लोकसभेचं दालन ओलांडून पुढे गेलो तर, राज्यसभेच्या एका कर्मचाऱ्याने हाक मारली. 'कुठं चाललात? शेवटचा चहा तरी घेऊन जा'. प्रश्नार्थक चेहरा पाहून तो म्हणाला, 'पुढच्या वेळी समोरच्या इमारतीत (नव्या संसद भवनात) गेल्यावर चहा पीत कुणाशी गप्पा तरी मारता येतील का?ङ्घ शेवटच्या अधिवेशनच्या शेवटच्या दिवशी जुन्या संसद भवनात चहा पीत संध्याकाळ घालवल्याची आठवण तुमच्या मनात कुठं तरी साठवली जाईल. बसा'. हा कर्मचारी कुठंही दिसला तरी आवर्जून थांबतो, महाराष्ट्राच्या राजकारणात त्याला फार रस.

# विराट कारकीर्द

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीसाठी गुरुवारचा दिवस खास आहे. चौदा वर्षांपूर्वी याच दिवशी म्हणजेच १८ ऑगस्टला विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. या १४ वर्षांत विराटने अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे.

माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली कोहलीने सलामीवीर म्हणून पदार्पण केले. या सामन्यात विराट कोहलीला काही खास कामगिरी करता आली नाही. पदार्पणाच्या सामन्यात त्याला २२ चेंडूंत केवळ १२ धावा करता आल्या. मात्र त्यानंतर विराट कोहलीने दमदार कामगिरीच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विराट कोहलीने त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत अनेक




मोठ्या विक्रमांना गवसणी घातली आहे. जून २०१० मध्ये झिम्बाब्वे दौऱ्यातून त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यानंतर २०११ मध्ये जून महिन्यातच विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय कसोटी सामना खेळला होता.

विराट कोहलीने आतापर्यंत १०२ कसोटीत ८ हजार ७४ धावा केल्या आहेत. २६२ एकदिवसीय सामन्यांमध्ये विराटने १२ हजार ३४४ धावा जमवल्या आहेत, तर ९९ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३ हजार ३०८ धावा केल्या आहेत.

विराट कोहली भारताच्या यशस्वी कर्णधारांपैकी एक आहे; परंतु गेल्या काही महिन्यांपासून तो धावांसाठी झगडत असल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या त्याची खराब वेळ आहे. मात्र लवकरच तो पुनरागमन करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सेरेना विल्यम्सचा धक्कादायक पराभव

स्टार आणि अनुभवी टेनीस खेळाडू सेरेना विल्यम्सला धक्कादायक पराभवाचा सामना करावा लागला. सिनसिनाटी मास्टर्समध्ये ब्रिटनच्या १९ वर्षीय एमा राडूकानूने सेरेनाचा दोन सेटमध्ये ६-४, ६-० असा पराभव केला. हा सामना एक तास पाच मिनिटे चालला. ४० वर्षीय विल्यम्स आणि एमा राडूकानू यांच्यात २१ वर्षांचे अंतर आहे.

गेल्या आठवड्यात सेरेनाने लवकरच खेळातून निवृत्ती घेणार असल्याचे जाहीर केले. अलीकडच्या वर्षांत सेरेनाला तिच्यापेक्षा लहान खेळाडूंकडून पराभव सहन करावे लागत आहे. सिनसिनाटीपूर्वी, ती टोरंटो ओपनमध्ये दुसऱ्या फेरीत १५ वर्षे लहान असलेल्या २५ वर्षीय बेलिंडा बेनकिच हिच्याकडून हरली होती.




त्याचप्रमाणे विम्बल्डन २०२२ मध्ये २४ वर्षीय हार्मनी टॅनकडून ती पराभूत झाली होती, तर २०२१च्या विम्बल्डनमध्ये २८ वर्षीय अलेक्झांड्रा सॅस्नोविच विरुद्ध मधल्या सामन्यात रिटायर्ड हर्ट झाली. २०२१ पासून तिने एकूण १० पैकी सहा सामने गमावले आहेत.

# 'शाळा गेली चुलीत, सामना बघायला येणार ना'

'शाळा गेली चुलीत, भारत-झिम्बाब्वे यांच्यातील सामना बघायला येणार ना', शाळकरी मुलाचे हे उत्तर ऐकून भारताचा कर्णधार केएल राहुल अवाक झाला. राहुलने त्या मुलाला समज दिली. मात्र उद्या शाळेत महत्त्वाचे काही नाही, असे म्हणून त्या चाहत्याने राहुलला पुन्हा निरुत्तर केले. एका पत्रकाराने त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर या घटनेचा व्हीडिओ शेअर केला आहे.

भारतीय क्रिकेट संघ तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेकरिता झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे. बुधवारी पहिल्या एकदिवसीय सामन्यापूर्वी भारतीय संघ 'हरारे स्पोर्ट्स क्लब' येथे सराव करत होता. त्यावेळी एक किशोरवयीन चाहता त्याठिकाणी आला होता. त्याने कर्णधार केएल राहुल आणि सलामीवीर ईशान किशनसह फोटो




काढले. फोटो काढताना राहुलने या मुलासोबत संवाद साधला. या संवादादरम्यान मुलाने शाळेबद्दल काढलेले उद्गार ऐकूण काही क्षणांसाठी केएल राहुलही थक्क झाला होता. राहुलने या चाहत्याला विचारले, "उद्या सामना बघायला येणार का?" त्यावर त्या मुलाने झटकन उत्तर दिले, "येणार ना! शाळा गेली चुलीत". मुलाचे उत्तर ऐकून राहुलने त्याला समज दिली. मात्र उद्या शाळेत महत्त्वाचे काही नाही, असे म्हणून त्या चाहत्याने राहुलला पुन्हा निरुत्तर केले.

# 'समर्थ'चे ज्युदो प्रशिक्षण शिबीर २२ ऑगस्टपासून

**मुंबई (वार्ताहर) :**

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर ही संस्था व्यायाम व शारीरिक शिक्षण क्षेत्रात गेली ९५ वर्षे कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने यंदाही दि. २२ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२२ या कालावधीत 'ज्युदो प्रशिक्षण शिबीर' छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित करण्यात आले आहे. संध्याकाळी ७ ते ८ या वेळात शिबिरार्थींना ज्युदो ह्या खेळाच्या मुलभूत कुवतींचे प्रशिक्षण तसेच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या प्रशिक्षण दिले जाणार आहे.



या शिबिराचे संपूर्ण मार्गदर्शन संशय रवींद्र पाटील ह्यांच्या उपस्थितीत होणार आहे. मिस्टर रवींद्र पाटील हे ब्लॅक बेल्टची ७वी पदवी मिळवणारे देशातील पहिले आंतरराष्ट्रीय रेफ्री आहेत. तसेच महाराष्ट्र ज्युदो असोसिएशनचे ते टेक्नीकल चेअरमन देखील आहेत. ह्यांच्याच मार्गदर्शनाखाली सलग ८ दिवस हे शिबीर चालणार आहे. शिबिराच्या प्रत्येक सत्रानंतर सर्व शिबिरार्थींना पौष्टिक खुराक दिला जाणार आहे.

या आठदिवसीय ज्युदो प्रशिक्षण शिबिरात ६० टक्के गुण प्राप्त करणाऱ्या शिबिरार्थीस श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर ह्या संस्थेत प्रवेश घेता येऊ शकतो. ह्या शिबिरात सहभागी होण्यासाठी श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर या संस्थेला भेट देऊन सर्व माहिती मिळवता येईल. पहिल्या १०० शिबिरार्थींना प्रवेश देण्यात येईल.

# अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशनचे यश

अश्वमेध वेटलिफ्टिंग फाउंडेशन ठाणे व वेटलिफ्टिंग असोसिएशन ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच ठाणे जिल्हा वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. १३ वर्षे, १५ वर्षे व (यूथ) १७ वर्षांखालील मुले व मुली अशा गटांत ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशनने घवघवीत यश मिळवले.

या स्पर्धेत १३ वर्षे वयोगटात रोनित लोखंडे-जय जवान व्यायामशाळा उंबरडे, रिया मलबारी, १५ वर्षे वयोगटात अथर्व आंब्रे-अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशन, ठाणे, वेदिका दत्तात्रय टोळे - अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशन ठाणे, १७ वर्षे वयोगटात रुषभसिंग राजपूत - अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशन, माही



## ठाणे जिल्हा वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा

बाभूळकर - अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशन, ठाणे यांनी विजेतेपद पटकावले, तर मुले-मुली १३ वर्षे वयोगटात रिक्रीएशन व्यायामशाळा कल्याण, १५ वर्षे वयोगटात रिक्रीएशन व्यायामशाळा व १७ वर्षे वयोगटात अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशनने ठाणे यांनी सांघिक विजेतेपद पटकावले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय टोळे व मधुरा सिंहासने टोळे व अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली. स्पर्धेच्या उद्‌घाटनाला महाराष्ट्र राज्य वेटलिफ्टिंग संघटनेचे उपाध्यक्ष अनिल माहुली, तालुका क्रीडा अधिकारी दीप्ती आंब्रे, वेटलिफ्टिंग असोसिएशन ठाणे चे सचिव गणेश खानविलकर, शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मधुरा सिंहासने व शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त सुनील दळवी, युवा सेनेचे कोपरी पाचपाखाडी समन्वयक दीपक झाडे, अश्वमेध वेटलिफ्टिंग फाऊंडेशन ठाणेचे अध्यक्ष अविनाश लबडे हे मान्यवर उपस्थित होते.

## 70 लाखांना विकणार होते मांडूळ साप, सापळा रचून पोलिसांनी पाच जणांना केली अटक



काळा जादू करण्यासाठी मांडूळ जातीचा साप 70 लाखांना विकण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या टोळीला सापळा रचत कल्याणच्या डीसिपी स्कोडने अटक केली आहे. मांडूळ सापाची तस्करी करणाऱ्या पाच ही जणांना पोलिसांनी अटक केली आहे. तर त्यांच्या एक साथीदार निसटण्यात यशस्वी झाला. पोलिस त्याचा शोध घेत आहेत. खडकपाडा पोलिसांनी मांडूळ साप जप्त केला आहे. हा साप कुणाला विकण्यासाठी आणला होता. या टोळीने आणखी किती लोकांना मांडूळ साप विकले आहेत, याचा तपास पोलीस करत आहेत. निलेश हीलिम, चेतन कांबळे, अरविंद पंडित, विशाल ठाकरे, अनिल काटे अशी अटक आरोपींची नावे आहेत. तर त्यांचा साथीदार मधुकर हा पसार झाला आहे. मांडूळ प्रजातीचा साप हा झटपट श्रीमंत होण्यासह अनेक अंधश्रद्धेपोटी मांडूळ सापाची तस्करी गेल्या काही वर्षापासून वाढत आहे. कल्याणचे डीसिपी सचिन गुंजाळ यांना पालघर येथे राहणारे काही जण मांडूळ साप विकण्यासाठी कल्याणला येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे कल्याण डीसीपी स्कोडचे संजय पाटील, ऋषिकेश भालेराव, सदाशिव देवरे व खडकपाडा पोलिसांच्या पथकाने रविवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अग्रावाल कॉलेज जवळ सापळा रचला. या दरम्यान तीन दुचाकीवरून सहा जण येताना पोलिसांना दिसले. डीसीपी स्कोडच्या पथकाला संशय आल्याने त्यांनी या सहा जणांना हटकलं. त्यांची चौकशी केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय बळावला.

## डोंबिवलीत महागड्या दुचाकी चोरणाऱ्या चोरट्याला अटक



डोंबिवली, कल्याण परिसरात महागड्या दुचाकी चोरणाऱ्या एका सराईत चोरट्याला कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी अटक केली आहे. या चोरट्याच्या अटकेने डोंबिवली, कल्याण परिसरात आतापर्यंत झालेल्या वाहन चोरीच्या घटना उघडकीला येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली. काशीम युनूस अली (२२) असे चोरट्याचे नाव आहे. तो मुळचा उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यातील कुलममुर ग्यानपूर गावचा रहिवासी आहे. काशीम हा मुंबईत झटपट कामधंदा मिळतो आणि पैसेही मिळतात म्हणून कल्याण मध्ये आला. त्याला येथे आल्यापासून कोठेच काम मिळाले नाही. उपजीविका कशी करायची असा प्रश्न त्याच्या समोर होता. त्याने शक्कल लढवून दुचाकी चोरुन त्या विक्री करण्यास सुरुवात केली. कल्याण गुन्हे शाखेतील हवालदार गुरुनाथ जरग यांना दुचाकी चोरणारा एक चोरटा दुचाकी विकण्यासाठी कल्याण शिळफाटा रस्त्यावरील प्रीमिअर कॉलनी येथे येणार आहे अशी माहिती मिळाली. त्यांनी ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर शिरसाठ यांना दिली. त्यांनी दिलेल्या आदेशानुसार साहाय्यक पोलीस निरीक्षक मोहन कळमकर, हवालदार गुरुनाथ जरग यांच्या पथकाने तात्काळ कॉलनी भागात सापळा लावला. तिथे तो तरुण दुचाकी वरुन येताच पोलिसांनी त्याला हटकले. तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. चौकशीत त्याने कल्याण, डोंबिवलीतून दोन महागड्या दुचाकी चोरी असल्याची कबुली दिली. दुचाकींचे वाहन क्रमांक बदलून तो त्या वापरत होता. चांगला ग्राहक मिळाला की तो त्याची विक्री करत होता. काशीम कडून दोन दुचाकी, एक मोबाईल जप्त करण्यात आला आहे.काशीमने आतापर्यंत किती दुचाकी डोंबिवली परिसरात चोरल्या. त्या कोणाला विकल्या आहेत याचा तपास पोलीस करत आहेत.

## परभणीत 17 लाखांची बोगस कीटकनाशकं जप्त, पाच जणांना ठोकल्या बेड्या



रभणीच्या मानवतमध्ये शेतकऱ्यांनी बोगस कीटकनाशकं पकडली आहेत. या प्रकरणी मानवत पोलिसांनी बुलढाण्याच्या (Buldhana) मेहकर येथून एका कृषी केंद्र चालकाला अटक केली असून त्याच्याकडून तब्बल 17 लाख रूपयांचे बोगस कीटकनाशक जप्त करण्यात आले आहे.

कृषी केंद्र चालकासह या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना बेड्या ठोकल्या आहेत. सतीश तरोडकर, दत्ता शिंदे, मुकेश राठी, श्रीराम गिरी आणि किशोर आंधळे अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मानवत परिसरामध्ये 9 ऑगस्ट रोजी एका कारमधून पेन्सी बायो या कंपनीचे बायो आर 303 हे बोगस फवारणी औषध विक्री केले जात असल्याची माहिती काही शेतकऱ्यांना मिळाली. या माहितीच्या आधारे सुनील बावळे, अर्जुन पंडित या शेतकऱ्यांनी कारचा पाठलाग करून त्यांना पकडले. यावेळी 4 लाख 65 हजार 2376 रुपयांचे बोगस औषध असल्याचे आढळून आले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर मानवत पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. बुलढाण्यातील मेहकर येथून किशोर आंधळे याला अटक करण्यात आली होती. त्याची विचारपूस केल्यानंतर पोलिसांनी त्याच्या मेहकर येथील उटी या परिसरातून याच बायो आर कंपनीचे बोगस कीटकनाशक जप्त केले आहेत.पोलिसांनी 47 बॉक्स बोगस कीटकनाशक जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेल्या बोगल किटकनाशकाची किंमत 17 लाख रुपये एवढी आहे.

यापूर्वी देखील 4 लाख 66 हजार रुपयांची बोगस औषधे आणि आता 17 लाख 30 हजार असा एकूण 22 लाख रूपयांची बोगस औषधे जप्त करण्यात आली असून या प्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. या टोळीने आणखी कुठे कुठे ही बनावट औषधे विक्री केली आहेत आणि किती प्रमाणात केली आहे? याचा तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान, या प्रकरणावरून शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला असून याबाबत दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. आगामी काळात तरी अशा बोगस बीयाने आणि औषधांची विक्री करणाऱ्यांवर वचक बसेल असे मत शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्रातील सत्तासंघषाची सुनावणी पुन्हा लांबणीवर; कधी उजाडणार 'तो' दिवस ?



महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर गेल्या काही दिवसांपासून सुरु असणारा सत्तासंघर्ष सर्वोच्च न्यायालयाच्या दारी पोहोचल्यामुळे शिंदे- फडणवीस सरकारचं भविष्य नेमकं काय असणार या प्रश्नाचं उत्तर गुलदस्त्यातच राहिलं. त्यातच आता पुन्हा एकदा ही सुनावणी लांबणीवर गेल्यामुळं सत्ताधाऱ्यांची धाकधुक वाढली आहे. राज्यातल्या सत्तासंघर्षावरील सुनावणी पुन्हा लांबणीवर पडल्याची माहिती नुकतीच समोर आली आहे. परिणामी आज (22 ऑगस्ट) होणारी सुनावणी आता उद्या (23 ऑगस्ट) होणार आहे. त्रिसदस्यीय खंडपीठातील न्यायमूर्ती सी. टी. रवीकुमार यांच्या आजच्या अनुपस्थितीमुळं ही सुनावणी लांबणीवर गेल्याचं सांगण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी ४ ऑगस्टला शेवटची सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर तिसऱ्यांदा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. शिंदे गटाच्या 16 आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा तसंच या संदर्भात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिका पुढील सुनावणीसाठी घटनापीठाकडे सोपवणार का याचा निर्णय न्यायालयात होणार आहे. सदरील सर्व याचिकांवर सोमवारी सरन्यायाधीश एन. व्ही. रामण्णा यांच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार होती. सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा हे 26 ऑगस्ट रोजी निवृत्त होत असून, त्याआधी निर्णय होण्याची आशा शिवसेनेला आहे.

## घरातून बेपत्ता झालेल्या 12 वर्षांच्या मुलाचा, आठ महिन्यांनंतर पुणे ग्रामीण पोलिसांकडून मुलाचा शोध

पुणे 12 वर्षांचा मुलगा त्याच्या घरातून बेपत्ता झाल्यानंतर, आठ महिन्यांनंतर, पुणे ग्रामीण पोलिसांनी एका 12 वर्षांच्या मुलाचा शोध घेतला आहे. त्याला त्याच्या आजीसोबत पुन्हा भेटण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात, 12 वर्षांचा मुलगा त्याच्या घरातून बेपत्ता असल्याची तक्रार आली आणि लोणावळा पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार नोंदवण्यात आली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुलाने लहान वयातच त्याचे पालक गमावले आणि त्याचे संगोपन त्याच्या आजीने केले.

अज्ञात व्यक्तीविरोधात एफआयआर दाखल सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आणि त्यानंतरच्या सरकारच्या निर्णयानुसार, अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाच्या आरोपाखाली एफआयआर दाखल करण्यात आला कारण हे प्रकरण 14 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलाच्या बेपत्ता होण्याशी संबंधित होते.

लोणावळा शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने प्राथमिक तपास केला आणि काही दिवसांनंतर, हे प्रकरण पुणे ग्रामीण पोलिसांच्या मानव तस्करी विरोधी युनिटकडे (एएचटीयू) देखील पाठवण्यात आले आणि संयुक्त तपास सुरू करण्यात आला.स्थानिक स्रोतांकडून, गुप्तचरांकडू मिळाली माहिती स्थानिक स्त्रोतांकडून गोळा केलेल्या विविध माहिती आणि गुप्तचरांच्या आधारे केलेल्या तपासात कोणतेही धागदोरे मिळाले नाहीत. पण दोन आठवड्यांपूर्वी, पोलिसांना मुलाच्या ठिकाणाविषयी नवीन माहिती मिळाली आणि तो लोणावळयाच्या वेगळया भागात सापडला. मुलाने सुरुवातीला पोलिसांना सांगितले की तो ड्रग्स घेत होता आणि जेव्हा त्याला जाग आली तेव्हा तो दिल्लीत होता. त्याने पोलिसांना सांगितले की,

त्याला पुन्हा अमली पदार्थ पाजले गेले आणि दुसऱ्या ठिकाणी नेले जेथे त्याला रस्त्यावर भीक मागायला लावले. संभाव्य अपहरण आणि मानवी तस्करीचा तपास संभाव्य अपहरण आणि मानवी तस्करीचा प्राथमिक तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिसांना मात्र मुलगा सांगत असलेल्या घटनेमध्ये काहीतरी वेगळे दिसले. पोलिसांनी मुलाचा विश्वास संपादन केल्याने, त्याने आजीच्या उपस्थितीत नेमके काय घडले ते त्यांना सांगितले, ज्याची पोलिसांनीदेखील पडताळणी केली आहे. मुलाला त्याच्या मावशी आणि काकांनी केली मारहाण मुलाला त्याच्या मावशी आणि काकांनी कधी कधी मारहाण केली होती. यामुळे तो घर सोडण्याचा विचार करीत होता आणि त्याने यापूर्वी एकदा प्रयत्न केला होता. जानेवारी महिन्यात ते घर सोडून रेल्वेने ठाण्यातील बदलापूरला गेला.

## चोरट्यांचा चक्क आमदाराच्या कार्यालयातच डल्ला, सीसीटीव्हीची केली नासधूस




गेल्या काही दिवसांपासून नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यासह शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. दरम्यान चोऱ्यांच्या अनेक घटना ताज्या असतानाच, काल रात्री हदगाव हिमायतनगर मतदारसंघाचे कॉँग्रेसचे आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या कदमनगर येथे असलेल्या पक्ष कार्यालयातच चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. यावेळी सीसीटीव्हीची नासधूस करत चोरट्यांनी मोबाईलसह इतर साहित्यावर डल्ला मारलाय. थेट आमदारांच कार्यालय फुटल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

माधवराव पाटील यांच्या कार्यालयात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास चांगलाच धुमाकूळ घातला. यावेळी अंध दिव्यांगासाठी वाटपासाठी आणलेले तीन मोबाईल चोरट्यांनी लांबवले आहेत. आज सकाळी आमदारांच्या पक्ष कार्यालयात नेहमी प्रमाणे तिथे असलेले सेवक कार्यालयात आले असता सर्व प्रकार समोर आला. पक्ष कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व ईतर साहित्य इतरत्र पडले होते. त्यामुळे याची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. सामान्यांच्या घरानंतर आमदारांच्या घरीच चोरट्यांनी चोरी केल्याची माहिती मतदारसंघात वाऱ्यासारखी पसरली. तर पोलिसांनी श्वान पथकासह धाव घेतली. पोलिसांच्या चौकशी दरम्यान दिव्यांगासाठी वाटप करण्यात येणाऱ्या मोबाईलपैकी तीन मोबाईल चोरीला गेल्याचे निदर्शास आले आहे. तर यावेळी आपली ओळख पटू नयेत म्हणून चोरट्यांनी कार्यालयात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नासधूस केली. पण मोबाईल वेतिरिक्त कार्यालयात चोरट्यांच्या हाती काहीच न लागल्याने त्यांनी काढता पाय घेतला असल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितले आहे.

### पोलिसांसमोर तपासाचे आव्हान...

आधीच हदगाव शहरात चोरट्यांच्या धुमाकूळमुळे पोलिसांची अडचण वाढली असतांना, आता चक्क एका आमदारांच्या कार्यालयावरचं चोरट्यांनी डल्ला मारत एकप्रकारे पोलिसांना आव्हान दिले आहे. त्यामुळे या चोरांचा शोध घेऊन बेड्या ठोकण्याचे पोलिसांसमोर आव्हान असणार आहे. त्यामुळे आता पोलीस या चोरट्यांच्या शोध घेण्यात कितपत यशस्वी होतात हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे. गेली काही दिवस शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होतांना पाहायला मिळत आहे. त्यातच आता चक्क आमदार पाटील यांचे कार्यालय चोरट्यांनी फोडल्याने पोलिसांचा धाक उरला की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## मजुरांचे हातपाय बांधून मुकादमाकडून जबर मारहाण, माढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



सोलापूर माढा तालुक्यातील भुताष्टे गावात दोन मजुरांना त्यांच्याच मुकादमाने जबर मारहाण केली आहे. त्या मारहाणीचा धक्कादायक व्हिडीओ सोशल मीडियावरून समोर आला आहे. दोघा मजुरांचे हातपाय बांधून ठेकेदाराकडून अमानुषपणे मारहाण करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर पाहून संताप व्यक्त केला जात आहे. माढा पोलीस ठाणे येथे याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मजुरांच्या पत्नीने तक्रार दाखल केली सोनाली विकास नाईकवडे यांच्या फिर्यादीवरून बालाजी मोरे भालचंद्र अनंत यादव व इतर अनोळखी दोघांवर असे एकूण चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकास नाईकवडे व सेवक कसबे असे जखमी मजुरांची नाव आहेत. त्यांच्यावर खासगी व सरकारी दवाखान्यात प्रथमोपचार करण्यात आले आहे. हा प्रकार 15 ऑगस्ट रोजी माढा तालुक्यातील भुताष्टे या गावात घडला आहे. 17 ऑगस्ट रोजी याबाबत माढा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस बातमी पत्र
ALL SCAN & PAY ACCEPTED HERE
PhonePe G Pay Pay

## मुंबईतील महिला व्हिसासाठी भरायला गेली 2 रुपये अन् 2 लाख गमावून बसली



पती आणि मुलीसोबत परदेशी सहलीवर जाणाऱ्या महिलेला व्हिसा प्रक्रियेत २ लाख रुपयांचा चूना लागल्याची घटना मुंबईत घडली आहे. व्हिसा एक्झिक्युटिव्ह असल्याचे भासवत आरोपीने त्यांची फसवणूक केली. व्हिसा प्रक्रियेत २ रुपये भरायचे सांगत आरोपीने त्यांना २ लाख रुपयांना गंडा घातला. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

युरोप सहलीसाठी केला होता अर्ज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत चारकोप येथे राहणाऱ्या शशी निरंकारनाथ कौशल आपली पत्नी आणि मुलीसोबत युरोप सहलीवर जाण्याची योजना आखत होते. १२ जुलै रोजी त्यांनी तीन व्हिसासाठी ऑनलाइन अर्ज केला होता. हा अर्ज करुन जवळपास एक महिना झाला त्यामुळे त्यांना अर्जाची स्थिती जाणून घेण्याचे होते.

शनिवारी त्यांची पत्नी रुची गुप्ता घरी असल्याने त्यांनी स्टेटस तपासण्यासाठी http://www.vfsglobal.com वर लॉग इन केले. गुप्ता यांनी व्हीएफएस ग्लोबल कंपनीचा कस्टमर केअर नंबर मिळवला आणि त्या नंबरवर कॉल केला आणि एका प्रसिद्ध कुरिअर कंपनीकडून व्हिसाचे ट्रॅकिंग आयडी मिळवले. त्यानंतर रुची यांनी कुरिअर कंपनीच्या वेबसाइटवर लॉग इन करून कस्टमर केअरचा नंबर डायल केला वेबसाइटवर दिलेल्या नंबरवर कॉल केला पण दोन रिंगमध्ये कॉल डिस्कनेक्ट झाला.

### व्हिसा एजंट असल्याचे सांगत फसवणूक

कॉल डिस्कनेक्ट झाल्यानंतर लगेचच तिला एका मोबाईल क्रमांकावरून फोन आला. आपण व्हिसा एजंट असून प्रक्रिया शुल्क भरले गेले नाही म्हणून त्यांचा व्हिसा पाठविला गेला नसल्याचे रुची यांना सांगण्यात आले. त्या व्यक्तीने रुची यांच्या मोबाईलवर एक लिंक पाठवली आणि प्रक्रिया शुल्क म्हणून थोडी रक्कम भरावी लागेल त्यानंतर व्हिसा पाठवले जातील असे सांण्यात आले. यासाठी त्यांना केवळ २ रुपये भरावे लागतील अस सांगण्यात आलं होतं. मात्र, फोन करणारी व्यक्ती कोणतीही व्हिसा एजंट नसल्याचे सिध्द झाले आहे.

### आरोपीचा शोध सुरु

रुची यांनी लिंकवरुन २ रुपये भरल्यानंतर पुढील चार मिनिटांत रुची यांच्या बँक खात्यामधून २ लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची मेसेज त्यांना मिळाला.

आरोपीने २५ हजार रुपयांचे ८ व्यवहार केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (सी), ६६ (डी) अंतर्गत आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.

रुची यांच्या मोबाईलवर आलेल्या एसएमएसच्या आधारे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898